**महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे - 04**

**प्रसिद्धीपत्रक**

**<u>महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा (TET) 2024</u>**

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेमार्फत शिक्षक पात्रता परीक्षा (TET) 2024 दि. 10 नोव्हेंबर 2024 रोजी संपूर्ण महाराष्ट्र राज्यभर आयोजित करण्यात आली होती. सदर परीक्षेचा अंतरिम निकाल दि. 31 जानेवारी 2025 रोजी प्रसिद्ध करण्यात आला होता. अंतरिम निकाल लागल्यानंतर दि. 31 जानेवारी 2025 च्या प्रसिद्धीपत्रकान्वये दि. 01 फेब्रुवारी 2025 ते 06 फेब्रुवारी 2025 पर्यंत उमेदवारांच्या लॉगिनद्वारे आक्षेप मागविण्यात आले होते. तसेच दि. 07 फेब्रुवारी 2025 रोजी सुधारित अंतिम उत्तरसूचीनुसार दि. 10 फेब्रुवारी 2025 पर्यंत ईमेलद्वारे आक्षेप मागविण्यात आले होते. लॉगिनद्वारे आणि ईमेलद्वारे प्राप्त झालेल्या आक्षेपांची पडताळणी करण्यासाठी एक समिती गठित करण्यात आलेली होती. समितीने प्राप्त आक्षेपांची पडताळणी करुन आक्षेपांबाबतचे निर्णय उमेदवारांच्या लॉगिनमध्ये व ईमेलवर प्राप्त झालेल्या आक्षेपांचे निर्णय संबंधितांच्या ईमेलद्वारे उपलब्ध करुन देण्यात येत आहेत. तरी त्याचे अवलोकन करण्यात यावे.

दि. 13/02/2025

**(अनुराधा ओक)**
**आयुक्त,**
**महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,**
**पुणे - 04.**